क्र.शिक्रापा/क्राश/रामाट्र/१७-१८/का-१३/ 1088
क्रीडा व युवक सेवा संचालनालय,
शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे
दिनांक :25 JAN 2018

प्रति,
जिल्हा क्रीडा अधिकारी
( राज्यातील सर्व )

विषय :- **क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन**
(राज्यस्तर मास्टर्स ट्रेनर्स)

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२५०/१२/क्रीयुसे-२, दि. २८ एप्रिल २०१४
२) संचालनालयाचे पत्र दि. २९/११/२०१७

उपरोक्त विषयान्वये, राज्याचे क्रीडा धोरण २०१२ नुसार, क्रीडा शिक्षकांसाठी,राज्यस्तरावर मार्स्टस ट्रेनिंग कार्यक्रमाचे आयोजन (सन २०१७-१८) **दिनांक १८ ते २८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत होत आहे.**

याकरीता आपणास कळविण्यात येते की,

- आपण मार्स्टस ट्रेनिंग कार्यक्रमाकरीता आपल्या जिल्हयातील निवडक क्रीडा शिक्षक यांची पाठविलेल्या नावांच्या याद्या मधील १० नावे अंतिम करण्यात यावीत.
- प्रशिक्षण शिबिराची ( मार्स्टस ट्रेनिंग) माहिती सह असलेल्या सोबतचे पत्र आपल्या जिल्हयातील संबधित १० क्रीडा शिक्षक यांना पोहचविण्याची व्यवस्था करण्यात यावी.
- सदरील शिबिरात सहभागी होण्यासाठी दिनांक १८ फेंब्रवारी २०१८ रोजी सांयकाळी ५.००वा. पर्यंत शिवछत्रपती क्रीडा संकूल,पुणे येथे उपस्थिती देण्यास सुचित करण्यात येऊन त्याबाबत अहवाल सादर करण्यात यावा.

तसेच उक्त संदर्भांकित पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती अद्याप पाठविण्यात आलेली नसल्यास ट्रॅक सूट साईज सह त्वरीत dsysdesk13@gmail.com या ई-मेल द्वारे पाठविण्यात यावी.

सोबत :- पत्र
( स्थळप्रत मा. सहसंचालक महोदय यांनी अनुमोदीत )

(आनंद व्यंकेश्वर)
उपसंचालक
क्रीडा व युवक सेवा
शिवछत्रपती क्रीडापीठ,पुणे

प्रत महितीस्तव
उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, विभाग –

क्र.शिक्रीपी/क्रीशि/रामाट्रे/१७-१८/का-१३/ 1089
क्रीडा व युवक सेवा संचालनालय,
शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे
दिनांक :- 25 JAN 2018

प्रति,

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

विषय :- **क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन**
(राज्यस्तर मास्टर्स ट्रेनर्स ट्रेनिंग)

उपरोक्त विषयान्वये राज्याचे क्रीडा धोरण २०१२ नुसार, खेळामधिल बदलेले अधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, नवीन खेळ, खेळांची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना होणे आवश्यक आहे. तालूका,जिल्हा,विभाग व राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानात भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रात होणारे बदल अवगत होण्यासाठी राज्यातील शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य क्रीडा प्रशिक्षण मिळावे याकरीता जिल्हयातील निवडक क्रीडा शिक्षकांचे राज्यस्तरीय मार्स्टस ट्रेनिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर आपणास आपल्या जिल्हयाचे मार्स्टस ट्रेनर म्हणून जिल्हास्तरावर आपल्या जिल्हयातील क्रीडा शिक्षकांना प्रशिक्षण शिबीरामध्ये प्रशिक्षण द्यावयाचे आहे.

आपण आपल्या प्रशालेच्या क्रीडा विभागत सातत्याने काम करुन विशेष प्राविण्या संपादन करुन जिल्हा, विभाग,राज्य व राष्ट्रीय शालेय संबधित संघटनांच्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन, आपल्या शाळेचे / महाविद्यालयाचे व त्याच बरोबर महाराष्ट्राचे नाव देशपातळीवर उंचाविलेले आहे. आपल्या प्रशालेच्या कामगिरीमध्ये अधिकाधिक वाढ होऊन राज्याच्या व देशाच्या नावलौकिकात अधिक भर पडून जास्तीजास्त पदके व नवीन उंच्चाक प्रस्थापित व्हावेत. याकरीता तज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, आहार तज्ञ, फिजिओथेपिस्ट, मानसोपचार तज्ञ यांचे मार्गदर्शन होण्यासाठी राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन (सन २०१७-१८) **दिनांक १८ ते २८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत होत आहे.**

आपणास याबाबत कळविण्यात येते की, सदरील प्रशिक्षण शिबिरामध्ये आपणास निवास, भोजन, ट्रॅक सुट, तज्ञांचे मार्गदर्शन व शासन निर्णयान्वये मान्य प्रवास भत्ता देण्यात येणार आहे. तरी आपण खालील दिलेल्या माहिती नुसार सदरील प्रशिक्षण शिबिरासाठी आपली उपस्थिती द्यावी. सदरील प्रशिक्षण शिबिर हे क्रीडा विषयक अभ्यास/ माहिती करीता असल्याने या व्यतिरिक्त इतर संघटनात्मक बैठका / सभा घेण्यास परवानगी नाही याची नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण शिबिराचा कालावधी | **दिनांक १८ ते २८ फेब्रुवारी २०१८** |
| २ | उपस्थिती | दिनांक १८ फेबुवारी २०१८ रोजी सांय. ५.००वा. |
| ३ | प्रशिक्षण शिबिराचे स्थळ | शिवछत्रपती क्रीडा संकूल, म्हाळूंगे-बालेवाडी,पुणे |
| | प्रशिक्षण शिबिर प्रारंभ | दि. १९ फेबुवारी २०१८ रोजी सकाळी ठिक ६.००वा. |
| ४ | प्रशिक्षण शिबिर करीता संपर्क | श्री गजानन पाटील – ९८९०९०६३९२, राजेंद्र साप्ते – ९८२२४८०५०९, श्रीम. संजीवनी पुर्णपात्रे – ७०३०९९०८५०, श्री प्रवीण ढगे – ९०२१६९०८१६, श्री योगेश शिर्के – ९८९०७१३३४४ श्री धीरज मिश्रा -९२०९३३७७७० श्रीम.दिपाली निकम – ९९२२२३९२०१, श्रीम. मधुश्री देसाई – ८१४९३६८५३५ |

| | |
|---|---|
| | सुचना :-<br>१. निवासी राहण्याच्या तयारीने सर्व दैनंदिन आवश्यक साहित्य बरोबर आणणे.<br>२. कोणतीही मौल्यवान वस्तू सोबत बाळगू नये.<br>१. मोबाईल व इतर वस्तू स्वतःच्या जबाबदारीवर प्रशिक्षण कालावधीत बाळगावे.<br>३. कोणताही आजार किंवा वैद्याकिय उपचार चालू असतील तर त्याची माहिती संबधित खेळाचे प्रशिक्षक व कार्यालयाकडे द्यावी.<br>४. सोबत क्रीडा गणवेश( टॅक सुट, टि शर्ट, शॉर्ट, स्पोर्टस शुज) तसेच शिटी, स्टॅाप वॉच, नोट बुक इ. आवश्यक साहित्य बरोबर आणावे. नसल्यास प्रशिक्षणामध्ये सहभागी करुन घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.<br>५. सोबत जोडलेला विहित नमुना आपण यापुर्वी सादर केलेला नसल्यास आपल्या व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरी व शिक्यासह आपली उपस्थिती नोंदविताना सादर करण्यात यावा.<br>६. आपल्या वैयक्तिक बँक खात्याची माहिती साठी चेक / पासबुक झेरॅक्स प्रत, तसेच प्रवास एसटी / रेल्वे भाडे तिकीट झेरॅक्स प्रत जमा करावी. |

सोबत :- विहित नमुना

( स्थळप्रत मा. सहसंचालक महोदय यांनी अनुमोदीत )

( आनंद व्यंकेश्वर)
उपसंचालक
क्रीडा व युवक सेवा
शिवछत्रपती क्रीडापीठ,पुणे

. प्रत योग्यत्या कार्यवाहीस्तव
मुख्याध्यापक –